26 AUG 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनोसायन्सच्या आठ विद्यार्थ्यांना परदेशात पीएच. डी. ची संधी



कोल्हापूर : निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे. सोबत डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. प्रमोद कसबे आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी येथील सात विद्यार्थ्यांची दक्षिण कोरियामधील तर एकाची जपानमधील प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये पीएच. डी. संशोधन करण्यासाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे , नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा, सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

शिवाजी विद्यापीठातील शरद सुनील माने (रा. कोळोली, कोल्हापूर) यांची जपानमधील ओसाका विद्यापीठ (जागतिक क्रमवारी ६८) येथे निवड झाली आहे. जिनेश ललितकुमार चौहान (रा. कोल्हापूर) यांची कोरिया विद्यापीठ, सेऊल (जागतिक क्रमवारी ७४), धनंजय दत्तात्रय कुंभार (रा. सुळगांव, बेळगांव) यांची ग्योंगसांग राष्ट्रीय विद्यापीठ, जिंजू (जागतिक क्रमवारी ३०१), ओमकार येल्लोसा पवार (रा. कोल्हापूर) आणि ज्ञानेश्वर हिंदुराव घाटगे (रा. चिंचवाड, कोल्हापूर) यांची जीऑनबुक राष्ट्रीय विद्यापीठ, सेऊल (जागतिक क्रमवारी ५५१), पवन मल्लेशाम कोडम (रा. सोलापूर) यांची चोन्नम राष्ट्रीय विद्यापीठ, योंगबोंग (जागतिक क्रमवारी ७५१), चंद्रशेखर संभाजी पाटील (रा. कुरणी, कोल्हापूर) यांची जेजू राष्ट्रीय विद्यापीठ, जेजू (जागतिक क्रमवारी १००१) आणि योगेश दादासो डांगे (रा. आष्टा, सांगली) यांची गॅचोन चिद्यापीठ, सेओंगनाम, दक्षिण कोरिया येथे भरघोस विद्यावेतनासह निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी बी.एस्सी., एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचा पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पूर्ण झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
2 6 AUG 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञान विभागातील १७ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील केमिकल इंजिनिअरिंगमधील १७ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतींमधून विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

शिवाजी विद्यापीठतील तंत्रज्ञान अधिविभागातील केमिकल इंजिनिअरिंग विभागातील बी.टेक. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्ह्यू घेतल्या. त्याचप्रमाणे काही कंपन्यांनी त्यांच्या कॉर्पोरेट कार्यालयात आणि व्हर्चुअल पध्दतीने मुलाखतीं घेतल्या. त्यातून बी.टेक. केमिकल अभियांत्रिकीच्या अंकेष चौगुले, ओंकार माने, वाल्मिक पाटील, सोहम भोले, सचिन कदम, दिव्या गव्हाणे, विद्युल्लता धर्मे, ऋतुजा खडके, समीक्षा मोरे, साईराज शिंदे, श्रेयस मिठारी, श्याम पाटील, वैष्णवी महाडिक, प्रीतम जामदार, पियुष सिंग, अक्षय राठोड आणि प्रणव कदम या विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली आहे. यामध्ये पुण्यातील टीसीएस, इन्फोसिस, ब्लॅक अॅन्ड विच इंडिया लिमिटेड, डब्लूटीई इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि., अल्काईल अमाइन्स केमिकल्स लि., इंजिनेरो टेक्नालॉजिज् (ठाणे), विनवेज् केमटेक (मुंबई) आणि ग्लेनमार्क लाईफ सायन्सेस प्रा. लि. (सोलापूर) या केमिकल क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचा समावेश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. डी. पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे, डॉ. जे. डी. पाटील, सेंट्रल ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशीनकर यांचे मार्गदर्शन लाभले. केमिकल इंजिनिअरिंग अधिविभागातील डॉ. डी. एम. नांगरे, एस. एम. गायकवाड, ए. बी. मडावी, पी. पी. पाटील, डॉ. आर. पी. कलनके, व्ही. एस. मोहिते, एस. पी. देहनकर यांनी परिश्रम घेतले.

लोकमत

# वस्तू संग्रहालयाचे आज उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वस्तू संग्रहालय संकुलाचे आज, शुक्रवारी २६ ऑगस्ट रोजी उद्घाटन होणार आहे. भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांच्या हस्ते या संकुलाचे तर शाहू छत्रपती यांच्या हस्ते राजर्षी शाहू लोकजीवन कलादालनाचे उद्घाटन होणार आहे. दुपारी चार वाजता राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल.

पुढारी

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत महत्त्वाचे निर्णय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपणार आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेत बैठकीत प्रशासकीय, शैक्षणिक पातळीवरील अनेक निर्णय घेण्यात आले. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. बैठकीत क्रीडा, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रांतील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांना शिष्यवृत्ती असे अनेक निर्णय झाले. व्यवस्थापन परिषद बैठकीत प्रशासकीय निर्णय मान्य झाल्याने प्रशासनास या निर्णयाची अंमलबजावणी करता येणार आहे.

पुढारी

# विद्यापीठ ऑफलाईन परीक्षेला ६ हजार ९३२ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत गुरुवारी १३ विषयांसाठी ६ हजार ९३२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. गुरुवारी बीएस्सी., बीए., एमबीए., एम.ए. बीई., बीए. बी.आर्किटेक्चर, एम.एस्सी., बी.फार्म, बीबीए, बीए.बीएड आदी विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठाने परीक्षेदरम्यान गैरप्रकार होऊ नये, यासाठी भरारी पथके नेमली आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे पावित्र्य राखावे, असे आवाहन केले आहे.